# इंद्रधनुषी दिवाळी

"Are you saying that you enjoyed blowing up things when you were young? - That is kind of scary your know.."

"Intro to Law" आणि "Speech and Debate" अश्या दोन्ही क्लासेसला नुकताच प्रवेश घेतलेल्या माझ्या मुलीनं मला खाडकन माझ्या तंद्रीतून भानावर आणलं. दरवर्षीप्रमाणं माझं तिच्याबरोबर दिवाळीच्या आठवणींना उजाळा आणणं सुरू होतं. प्रत्येकवर्षी लहानपणीची एक नवीन आठवण सांगून मी तिला माझ्याविषयीचा आदर वाढवण्यासाठी मदत करत असे. पण आजचा माझा प्रयत्न चांगलाच फसला होता. किल्ला बनवण्याची सगळी पध्दत तिला सांगून झाली. मग दिवाळी संपल्यावर, किल्ल्याच्या भुयारात (जे ठरवून त्याच कारणासाठी बनवलेले असे) लक्ष्मी तोटा ठेवून तो कसा उडवून द्यायचा याचं वर्णन करून सांगत होते. या अगदी साध्या-निष्पाप स्फोटाचा संदर्भ या काळातल्या मुलांना बॉम्ब आणि टेररिझमचीच आठवण करून देईल हे माझ्या लक्षातच न आलेलं. मग मी तिचा नाद सोडून दिला. आणि माझी मी एकटीच दिवाळीचे सगळे रंग मनात रंगवू लागले.

दिवाळी एकच पण आत्तापर्यंत किती वेगवेगळ्या रंगात साजरी केली. अगदी लहानपणी काहीच कळत नव्हतं त्यावेळी नवीन फ्रॉक, खाण्या-पिण्याची चंगळ आणि आईनं तेल चोपडून चांगली आंघोळ घालून दिली, की दिवाळी साजरी होत असे. एकदम सरळ-साधी सुगंधी दिवाळी. मग नंतर मोठं होवू लागल्यावर हळूहळू फटाक्यांची भीती नाहिशी झाली. मग मात्र दिवाळीच्या आदल्या दिवशी होलसेल मार्केटमधून फटाके आणायला गेलेल्या बाबांची अगदी वाड्याच्या दाराशी बसून वाट बघितलेल्याच्या आठवणी अगदी आजही झगझगीत आहेत मनात - अगदी शोभेच्या झाडाच्या प्रकाशाइतक्या. मग ते आले की त्या फटाक्यांचं वाटप. सगळ्यांना एकसारखे मिळण्याचा माझा अट्टाहास असत असे. त्यापायी मी अगदी लवंगी फटाक्याची माळही अर्धी कापून घेत असे. हळूहळू त्या दारुच्या वासाचा आणि फटाक्यांच्या आवाजाचा नशा उतरून गेला. आणि मग दिवाळीला रंग चढला तो रांगोळीचा. चार दिवस वेगवेगळ्या किती मोठ्या आणि कुठल्या रांगोळ्या काढायच्या याची खलबतं चालत असत. मग अगदी पर्फेक्ट रांगोळी मिळवण्याचा खटाटोप. जास्त बारीक नाही पण अगदी भरड नाही, बोटाच्या चिमटीत धरून रेघ काढून पाहिल्याशिवाय रांगोळीची खरेदी होत नसे. "इतकी चिकित्सा मी जेंव्हा भाजी आणायला सांगते तेंव्हा करत जा", असं आईचं कायमचं पालूपद ऐकावं लागे दिवाळीच्या दिवसात. एकदा सगळं जमलं की मग अगदी गुडघे अवघडून आणि पाठ मोडून येईपर्यंत रांगोळ्या काढण्याचं काम चालत असे. इतके कष्ट करून काढलेली रांगोळी पुसायची का, आणि मग जर पुसायचीच असेल तर इतके कष्ट का करायचे असे प्रश्न कधीच पडत नसत त्यावेळी.

दिवाळीवर असलेला फराळाचा खमंग रंग मात्र कितीही लहान-मोठं झालं तरी अगदी पक्का ऑईलपेंट असल्याप्रमाणं कायमचा बसलेला. आई आणि वाड्यातील सगळ्या काकू-मावशी एकत्र फराळाचे करत असत. त्याची तयारी सुरू असली, की त्यांच्या गप्पामधून त्या साऱ्या कामांची पडणारी उजळणी मनात एक उत्सुक आनंद निर्माण करायची. एकदा फराळाचे बनले, की मग फराळाच्या ताटांचं वाटप हे काम अगदी ठरलेलं असे. मग कोणाचं ताट आलं की त्याचं पूर्ण ॲनालिसिस होत असे. कोणाच्या चकल्या अलवार होतात, शंकरपाळी कोणाची खुसखुशीत असतात, जाळीदार अनारसे कसे कोणालाच जमत नाहीत,. आणि शेजारच्या एक काकू फराळाचं विकत आणतात पण घरी बनवल्याचं क्रेडिट घेतात... या आणि अशा अनेक बातम्यांची देवाणघेवाण फराळांच्या ताटांबरोबर चाले. मग प्रत्येकाचं आलेलं ताट रिकामं द्यायचं नाही, म्हणून त्यात घालून देण्यासाठी फराळाचं सोडून आणखी काही पदार्थ

आई करत असे. मग आपलं वेगळं ताट देण्याऐवजी त्यांच्याच ताटात आपण आपलं फराळाचं का नाही द्यायचं, याचं समाधानकारक उत्तर मला कधीच नाही मिळालं.

आणि मग दिवाळीचे हे सारे परिचयाचे रंग उतरून जाऊन तिला एक वेगळाच रंग चढला, जेंव्हा घर, आपली माणसं आणि देश यासर्वांपासून लांब जाऊन दिवाळी एकट्यानं साजरी केली तेंव्हा. साऱ्याच गोष्टी लुटुपुटीच्या वाटलेल्या. आईनं केलेल पदार्थ आठवून आठ्वून तसेच करण्याचा केलेला असफल प्रयत्न. मग इथल्या इनग्रेडिएंट्समधेच काहीतरी गडबड आहे, असं म्हणून मनाची काढलेली समजूत. लक्ष्मीपूजनाला साळीच्या लाह्या मिळत नाहीत म्हणून वापरलेल्या राईस क्रिस्पीज, बत्तासे नाहीत म्हणून वापरलेली शुगर कँडी. आणि मग मात्र या परदेशी दिवाळीला सबस्टीट्यूशनचा रंग चढू लागला. गुलाबजामसाठी खवाच हवा, नरकचतुर्दशीला उटणंच हवं हे सगळे अट्टाहास कमी होवू लागले. स्वत:ची आणि इतरांची कल्पकता वापरून जे मिळेल त्यात दिवाळी साजरी करण्यात वेगळाच आनंद वाटू लागला. खरं तर परदेशात साजरी केली जाणारी दिवाळी ही भारतीय पाककलेसाठी फार मोठा माईलस्टोन बनायला हवा. विविध पर्याय शोधून केले जाणारे अत्यंत चविष्ट फराळाचे पदार्थ या दिवाळीचा मानबिंदू असतात. इटालिअन रिकोटा चीजचे गुलाबजाम, फ्रेंच पेस्ट्रीशीटस वापरून बनणाऱ्या करंज्या-चिरोटे. मेक्सिकन टॉरटीआजचे बनणारे शंकरपाळे - अश्या विविध देशातली सामग्री एकत्र येऊन मी भारतीय दिवाळीचा फराळ बनवते त्यावेळी 'हे विश्वची माझे घर' याचा साक्षात्कार मला त्या फराळाच्या ताटात होतो.

आणि मग इथं अमेरिकेत दिवाळीच्या सुमारासच हॅलोविनही येऊ घातलेलं असतं. पहिल्या-पहिल्यांदा मी अगदी आवेशानं दिवाळी सुरू असताना हॅलोविनचं डेकोरेशन करायला विरोध करत असे. कसल्या त्या अभद्र चेटकिणी आणि भुतं लावायची दिवाळीला? मग माझ्या मुलीला जेंव्हा नरकासुराची गोष्ट सांगायला लागले तेंव्हा वाटलं अरे - हे तर सगळे नरकासुराचे भाऊबंदच की. मग दोन्हीही डेकोरेशन सुखानं एकत्र नांदू लागलं. विविध क्लृप्त्या लढवून आकाशकंदिल बनवणे हाही पाककलेसारखाच इथल्या दिवाळीचा मानबिंदू असतो. इतकी रिसोअर्सफुल लोकं घरी कंदिल, पणत्या बनवताना पाहूनच माझ्या मनात खरं तर दिवाळी साजरी झालेली असते आधीच.

आईच्या हातच्या खमंग भाजणीच्या चकल्या, सुगंधी तेल्-उटण्याचा वास, अभ्यंगस्नान- ओवाळणं या साऱ्या मागे सोडलेल्या आठवणींचे तरंग तर उठतच रहातात प्रत्येक दिवाळीला. त्या आठवणींनी मन भुसभुसशीत मातीप्रमाणं मोकळं होतं. पण मग त्या मातीला ओलावा मिळतो तो अनुभवाच्या मुठीतील क्षणांचा. मग त्याच मातीतून एका वेगळ्याच वैश्विक दिवाळीचे हिरवे कोंभ तरारून येतात आणि मग माझ्या मनातल्या इंद्रधनुषी दिवाळीचे रंग सुवासिक होवून जातात.

शिल्पा केळकर-उपाध्ये (फिनिक्स, अॅरिझोना)